तालुका कर्ज वाटप आढावा
<u>समिती स्थापन करणे बाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग**
**शासन निर्णय क्र.संकिर्ण ०३२२/प्र.क्र.३८/२-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २७ जून, २०२२

**संदर्भ -** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. कृषीपत-४/ पीक कर्ज/ समन्वय समिती/ २०२२, दिनांक १५.०६.२०२२

**प्रस्तावना :-**

राज्यातील शेतकऱ्यांना सार्वजनिक क्षेत्र बँका, खाजगी क्षेत्र बँका, प्रादेशिक ग्रामिण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येतो. तथापि शेतकऱ्यांना बँकाकडून विशेषता सार्वजनिक बँका व खाजगी बँका यांच्याकडून राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) यांनी निर्धारित केलेल्य लक्षांकानूसार कर्जपुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना प्रत्येक आर्थिक वर्षात खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी माहे मे/जून महिन्यात कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. तथापि बँकांकडून शेतकऱ्यांना विहित वेळेत कर्जपुरवठा होत नसल्याचेसुद्धा निदर्शनास आले आहे. याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार नाराजी व्यक्त केली आहे.

त्याअनुषंगाने राज्यातील शेतकऱ्यांना लक्षांकाप्रमाणे विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी संदर्भाधीन दि. १५.०६.२०२२ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार याबाबत मा. विधानसभा सदस्य (स्थानिक) यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील शेतकऱ्यांना निर्धारित लक्षांकाप्रमाणे बँकांमार्फत पुरेशा प्रमाणात व विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे **तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती** स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.विधानसभा सदस्य (स्थानिक) | समिती अध्यक्ष |
| २ | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ३ | गटविकास अधिकारी | सदस्य |
| ४ | नोडल अधिकारी/ शाखा व्यवस्थापक, अग्रणी बँक | सदस्य |
| ५ | नोडल अधिकारी/ शाखा व्यवस्थापक, ग्रामीण बँका | सदस्य |
| ६ | नोडल अधिकारी/ शाखा व्यवस्थापक, खाजगी क्षेत्रातील बँका | सदस्य |
| ७ | नोडल अधिकारी/ तालुका शाखा व्यवस्थापक, जि.म.स. बँका | सदस्य |
| ८ | तालुका उप/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था | सदस्य सचिव |

२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

(i) तालुका स्तरावर बँकांना निर्धारित करुन दिलेल्या लक्षांकाप्रमाणे पीक कर्ज वितरणाचा व नव्याने शेतकऱ्यांना कर्ज द्यावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

(ii) बँकांमार्फत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कर्ज तथा सवलतीच्या कार्यपध्दतीचे सुलभीकरण करणे. (जसे- शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन पीक कर्ज मागणी सुविधा इ.)

३. सदर समितीमार्फत खरीप हंगामामध्ये दरमहा आढावा बैठक घेण्यात येईल तसेच रब्बी हंगामामध्ये आवश्यकतेनुसार बैठक आयोजीत करणे आवश्यक राहील.

४. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०६२७११४८१४७२०२ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikrushna Anandrao Wadekar

Digitally signed by Shrikrushna Anandrao Wadekar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7305071c9d8b281074f8452b1a671851b99ce164d8bd282bfeb775611d0eb87e, pseudonym=A9B19E68D73171B69896843593789CD99AC6DBD5, serialNumber=2711D1231BE138057C3C88E0EFB4B1CD5177AA9E3C71FCD2EDF6EC025114EB89, cn=Shrikrushna Anandrao Wadekar
Date: 2022.06.27 11:50:55 +05'30'

**(श्रीकृष्ण वाडेकर)**
**वि.का.अ. तथा सहनिबंधक, सहकारी संस्था**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. उपमुख्यमंत्री तथा मा. मंत्री वित्त यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री, सहकार यांचे खाजगी सचिव
४) मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य (सर्व)
५) मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
७) मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई
८) मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड प्रादेशिक कार्यालय, पुणे
९) चेअरमन, राज्य स्तरीय बँकर्स समिती , बँक ऑफ महाराष्ट्र,पुणे.
१०) विभागीय आयुक्त, (सर्व)
११) जिल्हाधिकारी (सर्व)
१२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१४) सहायक निबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१५) तालुका कृषि अधिकारी (सर्व)
१६) गटविकास अधिकारी (सर्व)
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व)
१९) निवडनस्ती